**विशेष लेख क्र.१४६** ९ भाद्रपद १९२९ शके (सायं.५.३० वा.)
शुक्रवार, दि. ३१ ऑगस्ट २००७

## महिला व बालकांच्या लैंगिक शोषणाविरूद्धचा लढा आता अधिकच तीव्र

अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा १९५६ हा प्रामुख्याने अनैतिक लैंगिक व्यापारास प्रतिबंध करणारा कायदा आहे. स्त्रिया आणि मुली यांचे लैंगिक शोषण रोखणे किंवा पुर्णतः नाहीसे करणे, हा या कायद्याचा उद्देश आहे. या कायद्यान्वये एखाद्या व्यक्तिस लैंगिक व्यवसाय करण्यास उद्युक्त करणे, भाग पाडणे किंवा व्यवसायात दाखल करणे गुन्हा मानण्यात आले आहे. याचबरोबर लैंगिक व्यवसाय चालत असलेल्या ठिकाणी व्यक्तिस डांबून ठेवणे, लैंगिक व्यवसाय करण्यासाठी छळ करणे अथवा फूस लावणे, लैंगिक व्यवसाय करणाऱ्या व्यक्तिवर आपली गुजराण करणे आणि वेश्यागृह चालविणे अथवा वेश्या व्यवसाय करण्यास स्वतःची जागा वापरण्यास देणेही या कायद्यान्वये गुन्हा आहे.

महाराष्ट्रातून स्त्रिया आणि बालकांच्या अनैतिक व्यापारावर प्रतिबंध घालण्यासाठी ठोस प्रयत्न केले जात आहेत. अनैतिक व्यापारातून सुटका केलेल्या महिलांना संरक्षण देऊन त्यांच्या पुनर्वसनासाठी राज्यात दोन शासकीय, तर स्वयंसेवी माध्यमांच्या सहकार्याने एक अशी तीन संरक्षणगृह कार्यरत आहेत. या तिन्ही संरक्षणगृहांची एकूण क्षमता २५० इतकी असून सध्या येथे १३० महिलांना आधार देण्यात आला आहे. अनैतिक व्यवसायातून सुटका केलेल्या अल्पवयीन मुलींसाठी राज्यात चार विशेष बालगृहे कार्यरत आहेत. त्यांची एकूण क्षमता २०० असून, सध्या तिथे ११२ मुलींचे पुनर्वसन करण्यात आले आहे.

निराधार, निराश्रित महिलांकरिता राज्यात २० शासकीय राज्यगृहे आणि ९ स्वयंसेवी संस्था राज्यात कार्यरत असून त्यांची क्षमता ३,३५० इतकी आहे. सध्या तिथे ११२५ महिला राहात आहेत. स्वाधार योजनेखाली ४०० महिला व मुलींसाठीचे ६ कोटी रुपये खर्चाचे आधुनिक पुनर्वसन केंद्र तयार करण्यात येत असून या केंद्रात आरोग्य सेवा, मनोरंजन, समुपदेशन, कौशल्यावर आधारित प्रशिक्षण, संपर्क व्यवस्था, हेल्प लाईन यासारख्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. अशाप्रकारचे हे भारतातील पहिलेच केंद्र असून या केंद्राचे बांधकाम पूर्ण् होत आले आहे.

केद्रशासनाने सुरु केलेल्या स्वाधार योजनेखाली ९ संस्थांना केंद्र शासनाकडून अंतिम मान्यता मिळाली असून त्यापैकी ८ संस्था कार्यरत झाल्या आहेत. त्या मुंबई, चंद्रपूर, भंडारा, संगमनेर, पुणे, उस्मानाबाद, आणि बुलढाणा येथे आहेत. या केंद्राचा ३१५ महिला लाभ घेत आहेत.

केंद्रशासनाच्या पथदर्शी कार्यक्रमांतर्गत उगम क्षेत्रातील म्हणजे सोर्स एरियातील स्वंयसेवी संस्थांना फक्त एका वर्षाकरिता १२.८२ लाख रुपयांपर्यंतचे अनुदान दिले जाते तर रेडलाईट एरियामध्ये कार्य करणाऱ्या संस्थांना ८.२३ लाख रुपयांपर्यंतचे अनुदान दिले जाते. या अंतर्गत डेस्टिनेशन एरिया मध्ये ८ प्रकल्प सुरु आहेत. ते मुंबई, मुंबई उपनगर, नागपूर, परभणी, नांदेड, नाशिक, लातूर आणि बीड येथे कार्यरत आहेत.या प्रकल्पांतर्गत मान्यता मिळालेल्या स्वंयसेवी संस्थांनी ७५० महिला आणि मुलींची सुटका केली आहे. या संस्थांमध्ये टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्स-वरळी मुंबई, रेसक्यु फौंडेशन-चारकोप-कांदिवली, लोकदीप मानव विकास संस्था- परभणी, पंचशील शिक्षण प्रसारक मंडळ ता. पूर्णा-जि.परभणी, स्नेह बहुउद्देशीय संस्था-नागपूर, जनकल्याण मंडळ ता.मुखेड जि. नांदेड, कै.ठगुबाई शंकर देवरे सेवाभावी

...२/

संस्था- नाशिक, स्वंयसिद्धा महिला मंडळ-लातूर, तेजस्विनी ग्रामीण विकास संस्था- लातूर, युवा ग्राम विकास मंडळ ता. केज जि. बीड, श्रीकृष्ण महिला बालकल्याण व अपंग पुनर्वसन विकास मंडळ, ता. चोपडा जि. धुळे यांचा समावेश आहे. या सर्व संस्थांना जवळपास ४० लाखाचा निधी केंद्र शासनाने अनुदान म्हणून दिला आहे. तर जागृती मल्टीपरपज युवक शिक्षण संस्था-बुलढाणा, बहुजन महिला उत्कर्ष मंडळ-नागपूर आणि भारतमाता बहु. युवक विकास संस्था ता.अहमदपूर जि.लातूर या संस्थांना केंद्र शासनाच्या प्रकल्प छाननी समितीने तत्त्वत: मंजुरी दिली आहे.

अनैतिक व्यवसायास प्रतिबंध करण्याच्यादृष्टीने जनजागृती करण्यासाठीही पायलट प्रकल्पांतर्गत सोर्स एरिया मध्ये परभणी, लातूर आणि धुळे येथे तीन प्रकल्प कार्यान्वित आहेत.

या अधिनियमांतर्गत दाखल होणाऱ्या खटल्यांचा लवकरात लवकर निकाल लागावा, यादृष्टीने मुंबई येथे स्वतंत्र न्यायालयाची स्थापना करण्यात येत आहे. अनैतिक लैंगिक व्यापारास प्रतिबंध घालण्यासाठी राज्यात अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली २००५ मध्ये राज्यस्तरीय सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीने गृह विभागास त्रैमासिक कार्यक्रम ठरवून दिला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात अनैतिक लैंगिक व्यापारातून किती महिला व मुलींची सुटका झाली, किती गुन्हे दाखल झाले, किती गुन्हेगारांना शिक्षा झाली याची माहिती प्राप्त होणार आहे. या समितीने अनैतिक व्यवसायास आळा घालण्यासाठी महाराष्ट्राचा कृति आराखडा तयार केला आहे. दि. २० सप्टेंबर २००६ रोजीच्या शासन निर्णयान्वये अनैतिक लैंगिक व्यापारास प्रतिबंध घालण्यासाठी जिल्हास्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. जिल्हा पोलीस अधिक्षक/ उप आयुक्त हे या समितीचे अध्यक्ष असून जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी हे सदस्य-सचिव आहेत. अनैतिक व्यापारामध्ये बळी पडलेल्या महिला व मुलींची संख्या कमी करण्याकरिता उपाययोजना सुचविणे, त्यांच्या पुनर्वसनाचा कार्यक्रम हाती घेणे आणि यासंबधात जिल्ह्यातील घडामोडींवर लक्ष ठेवणे हे या समितीचे काम आहे. प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये पोलीस इनस्पेक्टर अथवा सहाय्यक पोलीस निरिक्षक यांना अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ मधील कलम १३ नुसार स्पेशल ऑफिसर म्हणून मार्च २००६ मध्ये घोषित करण्यात आले आहे.

अनैतिक व्यवसायासाठी मानवी व्यापार प्रतिबंधात्मक कार्य करण्यामध्ये महाराष्ट्र राज्याने फक्त पुढाकारच घेतला नाही तर विविध योजना, कृती कार्यक्रम, क्षेत्रिय पातळीवरील कार्य म्हणजे मुक्तता मोहीम, कायदेविषयक सल्ला, पुनर्वसन कार्यक्रम, प्रतिबंधात्मक कार्यक्रम, जाणीवजागृतीचे कार्यक्रम हाती घेऊन स्त्रिया आणि बालकांच्या लैंगिक शोषणाविरूद्धचा लढा अधिक तीव्र करतांना महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासात महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

**-- डॉ. सुरेखा मुळे**
वरिष्ठ सहाय्यक संचालक (माहिती)

००००००